**दिनांक १७.०२.२०२२ रोजीचे सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आलेला तसेच त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १२** :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२१-२२ अंतर्गत प्रस्तांवाना मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्रमांक १२** :- जिल्हानियोजन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचे कडून सन २०२१-२२ करिता अमरावती महानगरपालिकेस अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती अंतर्गत रु. १०.०० कोटी अनुदान मंजुर आहे.

यापुर्वी सन २०२१-२२ करिता अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती अंतर्गत मंजुर रु. १०.०० कोटी मधून मा. सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक ९१, दिनांक २०/१२/२०२१ नुसार एकुण १२ कामांचे रु. ५.५६ कोटीचे प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे कडे प्रशासकीय मान्यतेकरिता सादर केलेले आहे. प्रशासकीय मान्यता प्रक्रिया सुरु आहे.

सन २०२१-२०२२ करिता मंजुर रु. १०.०० कोटी पैकी (वरील प्रस्ताव व्यतिरिक्त) उर्वरित रु. ४.४४ कोटीचे प्रस्ताव तसेच मा. जिल्हाधिकारी यांचेशी झालेल्या चर्चेनुसार वार्षिक अर्थसंकल्पाच्या पुनर्नियोजनामध्ये झालेल्या वाढीमुळे अतिरिक्त रु.५.०० कोटीचे प्रस्ताव असे एकुण (४.४४+५.००) ९.४४ कोटीचे प्रस्ताव सादर करावयाचे आहे.

वरील प्रमाणे मंजुर अनुदानाचे प्रस्ताव सादर करतांना पुर्वनुभवानुसार कमी देकाराची प्राप्त होणाऱ्या निवेदेमुळे होणारी बचत लक्षात घेता सोबत जोडलेल्या यादी नुसार प्रशासनाच्या वतीने एकुण ५२ कामांचे अंदाजपत्रकीय एकुण रक्कम रुपये १२.८९ कोटीचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. तसेच सभेत झालेल्या चर्चेनुसार काही सन्मा. नगरसेवकांचे प्रभागातील कामे प्रस्तावित यादीत नसल्याने तसे प्रस्ताव त्वरीत सादर करुन तपासणी करुन अनुज्ञेय असल्यास यादीमध्ये कामे समाविष्ट करण्यात यावे. सदरहु, यादीस ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत असून ठराव याच सभेत कायम करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका, अमरावती.**

**स्वा/-**
**सभापती तथा महापौर,**
**महानगरपालिका, अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.